# सर्फराझ खानचा दुर्मिळ विक्रम!

## IPL इतिहासात अशी कामगिरी करणारा पहिलाच फलंदाज

**महाईन्यूज** | नवी दिल्ली

**आयपीएल २०२६ ची सुरूवात चेन्नई सुपर किंग्स संघासाठी निराशाजनक झाली आहे. सीएसकेला सलग तीन पराभवांना सामोरं जावं लागलं. पण यादरम्यान सर्फराझ खानची तिन्ही सामन्यांमधील कामगिरी संघासाठी दिलासादायक ठरली. सर्फराझ खानने आरसीबीविरूद्ध सामन्यात चौथ्या क्रमांकावर फलंदाजी करत अर्धशतक झळकावलं. या अर्धशतकासह त्याने आयपीएल इतिहासात मोठा विक्रम आपल्या नावे केला आहे.**



रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने प्रथम फलंदाजी करताना २५० धावांचा डोंगर उभारला. यासह प्रत्युत्तरात चेन्नई सुपर किंग्सचा संघ १९.४ षटकांत २०७ धावांवर सर्वबाद झाला. चेन्नईने हा सामना गमावला असला तरी संघाच्या फलंदाजी विभागाने २०० अधिक धावांचा डोंगर उभारत आपली चमकदेखील दाखवली. याशिवाय सर्फराझ खानने पॉवरप्लेमध्ये चौथ्या क्रमांकावर फलंदाजी करताना अर्धशतक झळकावणारा पहिला फलंदाज ठरत आयपीएलमध्ये इतिहास घडवला.

सर्फराझ खान चिन्नास्वामी स्टेडियममध्ये धावांचा पाऊस पाडतो. २०१५ मध्ये आरसीबीकडून खेळताना त्याने नाबाद ४५ धावा करून रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाला २०० धावांचा पल्ला गाठण्यात मदत केली होती. पावसामुळे तो सामना रद्द करण्यात आला होता. अकरा वर्षांनंतर, सर्फराझ त्याच मैदानावर परतला आणि यावेळी आरसीबीविरुद्धच त्याने आपली दुसरी सर्वोच्च आयपीएल धावसंख्या नोंदवली.

सीएसकेने सर्फराझच्या खेळीमुळे अवघ्या १९ चेंडूंमध्ये ३ बाद ३० धावांवरून ३ बाद ७७ धावा अशी मजल मारली. त्याच्या या खेळीने एक मोठा आयपीएल विक्रमही रचला. आयपीएलमध्ये चौथ्या किंवा त्यापेक्षा खालच्या क्रमांकावर फलंदाजी करताना पहिल्या सहा षटकांत अर्धशतक झळकावणारा तो पहिला फलंदाज ठरला.




# लागोपाठ ३ सामने गमावल्यानंतर CSK ला प्लेऑफमध्ये स्थान मिळणं कठीण!

**महाईन्यूज** | नवी दिल्ली

**ऋतुराज गायकवाडच्या नेतृत्वाखाली खेळत असलेल्या चेन्नई सुपर किंग्ज आयपीएल २०२६ स्पर्धेत सूर गवसलेला नाही. स्पर्धेतील सुरुवातीच्या तिन्ही सामन्यांमध्ये चेन्नई सुपर किंग्ज संघाला पराभवाचा सामना करावा लागला आहे. ५ वेळचा चॅम्पियन संघ असलेल्या चेन्नई सुपर किंग्ज संघाला सहाव्यांदा जेतेपदाची ट्रॉफी उंचावण्यासाठी चांगलीच कसरत करावी लागणार आहे. सुरुवातीचे तिन्ही सामने गमावल्यानंतर चेन्नई सुपर किंग्ज संघाचा प्लेऑफमध्ये जाण्याचा मार्ग आणखी खडतर झाला आहे. दरम्यान कसं असेल समीकरण? जाणून घ्या**



आयपीएल स्पर्धेत सर्व संघांना प्रत्येकी १४-१४ सामने खेळण्याची संधी मिळणार आहे. चेन्नई सुपर किंग्ज संघाचे आतापर्यंत ३ सामने खेळून झाले आहेत. या तिन्ही सामन्यांमध्ये चेन्नईला पराभवाचा सामना करावा लागला आहे. त्यामुळे अजूनही ११ सामने शिल्लक आहेत. जर हे ११ सामने जिंकले, तर चेन्नईचा संघ २२ गुणांपर्यंत पोहोचू शकतो. पण लागोपाठ ११ सामने जिंकणं अशक्य तर नाही, पण कठीण नक्कीच आहे.

सुरुवातीचे ३ सामने गमावले म्हणून चेन्नईचा संघ स्पर्धेतून बाहेर पडणार, असं मुळीच नाही. कारण शेवटच्या सामन्यानंतर कोणते ४ संघ प्लेऑफमध्ये प्रवेश करणार हे निश्चित नसतं. त्यामुळे चेन्नईला प्लेऑफमध्ये कुठल्याही अडथळ्याशिवाय प्रवेश करायचा असेल, तर कमीत कमी ८-९ सामने तरी जिंकावे लागतील. असं झाल्यास चेन्नईचा संघ १६ ते १८ गुणांपर्यंत पोहोचू शकतो. हे गुण प्लेऑफचं तिकीट मिळवून देण्यासाठी पुरेसे आहेत. पण जर याहून कमी सामने जिंकले तर, प्लेऑफचं तिकीट मिळवण्यासाठी इतर संघांवर अवलंबून राहावं लागेल.

चेन्नई सुपर किंग्ज संघाने जर ७ किंवा ८ सामने जिंकले, तर समीकरण हे नेट रनरेटवर अवलंबून असेल. सुरवातीच्या तिन्ही सामन्यांमध्ये चेन्नईला हवा तसा खेळ करता आलेला नाही. त्यामुळे नेट रनरेट हा निगेटिव्हमध्ये आहे. तो पॉझिटिव्ह करण्याचं आव्हान चेन्नई सुपर किंग्ज संघासमोर असणार आहे. जर चेन्नईला गुणतालिकेत अव्वल स्थान गाठायचं असेल, तर हे चेन्नईसमोरील सर्वात मोठं आव्हान असेल. कारण त्यासाठी चेन्नईला सर्व शिल्लक ११ सामने जिंकावे लागतील.